bluebytes
news that matters

लोकमत

Friday, November 06, 2009

**Pictorial warnings on tobacco products ineffective!**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Supplement: Hello Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Top-Left, Width(cms): 14, Height(cms): 16, Size(sq.cms): 224

# ‘तंबाखू उत्पादनांवरील चित्रमय इशारे अधिक ठळक छापा’

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - तंबाखूजन्य उत्पादने आरोग्याला घातक असल्याचे दर्शविणारे इशारे हे आकाराने कमी असल्याने अनेकदा दुर्लक्षित केले जातात. यामुळे हे चित्रमय इशारे मोठ्या आकारात छापून प्रभावशाली करण्यात यावेत, अशी मागणी हेलिस सेखसेरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थचे संचालक डॉ. पी.सी. गुप्ता यांनी केली आहे.




तंबाखूजन्य पदार्थांच्या अतिसेवनाने तोंड, गळा, अन्ननलिका, घसा या अवयवांना कर्करोग होण्याची शक्यता असते. व्यसनी लोकांना सावध करण्यासाठी तंबाखू उत्पादनांवरील पाकिटावर कर्करोगाचा चित्रमय इशारा असावा असा कायदा करण्यात आला आहे. मात्र उत्पादक कंपन्यांना या चित्रमय इशाऱ्याच्या आकाराबाबत पुरेपूर मुबलकता दिली गेली असल्याने या कायद्याचे वारंवार उल्लंघन करण्यात येत असल्याची गुप्ता यांची तक्रार आहे.

बहुतांश उत्पादनांच्या पाकिटावर या चित्रांना ४० टक्के भागातच छापले जाते, तर अनेक ठिकाणी केवळ १० टक्के भागावर ही चित्रे प्रदर्शित केल्याचे पाहणीत आढळले आहे. या पाकिटांवर असणाऱ्या कर्कचे चित्र, फुप्फुसांचा आकार बहुतांशी लोकांना समजत नाही. याशिवाय हे इशारे इंग्रजी भाषेतून छापण्यात येत असल्याने या विषयाचे गांभीर्य निरक्षर वर्गापर्यंत पोहोचत नाही, असे डॉ. गुप्ता यांनी सांगितले

यासंबंधात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे हेड अ‍ॅण्ड नेक सर्जरी असोसिएट प्रोफेसर डॉ. पंकज चतुर्वेदी आणि सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्या सीमा सुद उपस्थित होत्या.

याप्रसंगी बोलताना डॉ. चतुर्वेदी यांनी तंबाखूविरोधी कायदे आणि नियम हे कडक करून त्याची ठोस अंमलबजावणी केल्यास कर्करोगाचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी करता येईल, असे प्रतिपादन केले.

लहान आणि गरीब मुलांमध्ये तंबाखू सेवनाचे वाढते प्रमाण लक्षात घेता अगदी लहान वयापासूनच त्यांच्या मनावर कर्करोगाविषयाची जागरूकता बिंबविली गेली पाहिजे, असे मत सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्या संचालिका सीमा सुद यांनी लोकमतशी बोलताना व्यक्त केले.